International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# उत्तर भारतीय शास्त्रीय संगीतातील गत – अर्थ, स्वरूप आणि गुण

**Pravin Kaslikar**

Assistant Professor, Bharati Vidyapeeth School of Performing Arts

भारतीय संगीत हे जगातील एक अतिप्राचीन संगीत मानले जाते. मानवाच्या उत्क्रांती बरोबरच संगीताचा विकास होत गेल्याचे दिसून येते. अगदी काही पशुपक्षांच्या आवाजाचे अनुकरण करून सुरु झालेला हा प्रवास पुढे विविध गायन प्रकारांच्या निर्मिती पर्यंत येऊन पोचला. हा विकास होत असताना त्यात कंठसंगीताबरोबर वाद्य संगीतही विकसित झाले. भारतीय संगीतामध्ये कंठसंगीता एवढेच वाद्य संगीत देखील महत्त्वपूर्ण आहे.

साम गायनापासून ते आज पर्यंत अनेक स्वर आणि तालवाद्यांचा उपयोग साथसंगतीसाठी तसेच वृंदवादन आणि याही पुढे जाऊन एकल वादनासाठी झालेला दिसून येतो. कंठसंगीतामध्ये कालांतराने अनेक गायन प्रकार निर्माण झाले यामध्ये सामगायन, जातीगायन, प्रबंध, धृपद, धमार आणि पुढे खयाल याची निर्मिती झाली. स्वर वाद्यांचा विचार केल्यास पूर्वी वीणा व वेणू ही दोन वाद्ये प्रमुख होती यातील वीणा या वाद्यावर त्या - त्या काळात उपलब्ध असलेल्या कंठसंगीतातील रचनांचे वादन होत असल्याचे दिसून येते. खयाल गायनाच्या निर्मितीपर्यंत किंवा प्रसिद्धी पर्यंत हीच पद्धत रूढ असल्याचे दिसून येते. आजही वीणा वादक धृपद अंगानेच वादन करताना दिसून येतात. मात्र धृपदातून पुढे खयाल आला आणि एक नवविचार, नवकल्पना उदयास आली याचा आधार घेत विणा वाद्यानंतर प्रचारात आलेल्या सतार वाद्यासाठी कलाकारांनी खयाल रचनेशी मिळती जुळती रचना निर्माण केली त्याला 'गत' असे संबोधण्यात आले.

आज वाद्य वादनातील एक अविभाज्य भाग म्हणजे गत होय. आज सतार, सरोज या वाद्यांबरोबरच इतर अनेक वाद्ये प्रचारात आहेत, उदाहरणार्थ सारंगी, बासरी, संतूर, शहनाई, संवादिनी इत्यादी. या प्रत्येक वाद्यावर गत वाजवण्यात येते, तेव्हा इतक्या लोकप्रिय वादन प्रकाराचा म्हणजे रचनेचा नेमका अर्थ काय? त्याची उत्पत्ती कशी झाली? त्याचे स्वरूप नेमके कसे? या सर्व घटकांचा अभ्यास प्रस्तुत लेखात करण्यात आला आहे.

गत म्हणजे नेमकं काय? याचा शोध घेत असता असे लक्षात आले की, हा शब्द मुळात गती या शब्दापासून तयार झाला आहे. इंग्रजी भाषेत याला टेम्पो असे म्हटले आहे, याचाच अर्थ गतिमानता होय. 'सितार मालिका' या पुस्तकात पृष्ठ क्रमांक १६ वर उल्लेख केल्याप्रमाणे **"सतार वाद्याच्या अक्षरांचा उपयोग करत ज्या रचना करण्यात येतात त्यांना गती म्हणजे चाल म्हटल्या जाते, हा गती शब्दच आता गत म्हणून प्रचारात आहे"**. यासंदर्भात अजून एक उदाहरण द्यायचे झाल्यास मसीतखानी गत म्हणून प्रचारात असलेला एक गत प्रकार मुळात खयालाप्रमाणे विलंबित असतो म्हणून त्याला विलंबित गती आणि रजाखानी गत जिची लय जलद असते त्याला द्रुतगती असे संबोधण्यात येत असे. यावरून असे स्पष्ट


होते की गत हा शब्द गती म्हणजे टेम्पो यावरून आला आहे, आज देखील गत ह्या रचनेचा अभ्यास केला तर सहज दिसून येईल की त्या प्रत्येकाला एक विशिष्ट गती असते त्यारचनेत एक अंतर्भूत गती असते.

भाषेच्या अनुषंगाने गत शब्दाचा अर्थ देखील गती असाच देण्यात आलेला आहे. गत म्हणजे गती हे स्पष्ट झाल्यावर त्याचे स्वरूप नेमके कसे असते? याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. या ठिकाणी एक बाब अजून महत्वाची वाटते, पूर्वी गत म्हणजे फक्त सतार व सरोद वाद्यांवर वाजणारी रचना इतक्याच मर्यादित अर्थाने येत होती, मात्र याठिकाणी एक मुद्दा पुढे येतो तो म्हणजे इतर वाद्ये उदाहरणार्थ सारंगी, बासरी, शहनाई, संवादिनी या वाद्यांवरील रचनांचे काय ? त्यांना काय म्हणावे ? याचे उत्तर म्हणजे प्रत्येक वाद्याच्या वादकांनी आपापल्या वाद्याचे गुण आणि मर्यादा लक्षात घेऊन अनेक रचना निर्माण केल्या आहेत ज्या खयाल बंदीशी नाहीत, तसेच या प्रत्येकामध्ये एक भाग अंतर्भूत असतो तो म्हणजे त्यांची विशिष्ट गती, गतिमानता, प्रवाह. म्हणूनच लेखकाचे असे मत आहे की या रचनांना देखील गत म्हणणेच योग्य ठरेल. शिवाय आज सामान्य बोलाचालीत देखील या रचनांना गत असेच संबोधले जाते.

सतार आणि सरोद या वाद्यांसाठी निर्माण झालेल्या रचना उदाहरणार्थ मसीतखानी गत म्हणजे तीनताल आणि बारावी मात्रा, हे गणित सर्वांना ज्ञात आहे. शिवाय एका ओळीची स्थायी आणि एका ओळीचा अंतरा असे या रचनेचे स्वरूप असते मात्र आज संवादिनी सारख्या वाद्यांवर वाजणाऱ्या रचना या किमान दोन आवर्तनांची स्थायी आणि तसाच अंतरा, तसेच इतर अनेक तालांचा उपयोग अशा स्वरूपाच्या असल्याचे दिसून येते, म्हणून याला गत म्हणत नसावेत का? याचे उत्तर शोधताना सैनवंशीय अमृतसेन आणि त्यांनी तयार केलेल्या रचनांचा उल्लेख करावा लागेल. या रचना दोन आणि त्यापेक्षा जास्त आवर्तनांच्या असत. वेगवेगळया मात्रांपासून सुरू होणाऱ्या आणि निरनिराळया ढंगाच्या असत. यावरून असे म्हणता येईल की संवादिनी, बासरी इत्यादी वाद्यांवर वाजविल्या जाणाऱ्या रचनांना सैनवंशीय गतींचा आधार आहे, आज खयाल गायन अत्यंत लोकप्रिय आहे त्याचे संस्कार सर्व कलाकारांवर आपसूक झालेले आहेत त्यामुळे खयाल रचनेचा मोठा प्रभाव या वाद्यांवरील गतींवर असल्याचे स्पष्ट होते. गत या शब्दाचा अर्थ बघितल्यानंतर गतीचे स्वरूप नेमके कसे असते हे तिच्या काही लक्षणांवरून अभ्यासता यईल.

**गतीमध्ये आवश्यक घटक/ गुण –**

संगीत रत्नाकर या ग्रंथात 'गीत' संदर्भात उल्लेख करण्यात आलेला आहे, त्यामध्ये मातु म्हणजे शब्द आणि धातू म्हणजे स्वर, लय, ताल, राग असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यावरून गत हा प्रकार धातूमध्ये मोडतो असे आपण म्हणू शकतो. खाली दिलेल्या लक्षणांची पूर्ण कल्पना येण्यासाठी एक गत देण्यात आलेली आहे.




गत उदाहरण.

**अ. रागाचे स्पष्ट रूप दाखवणारी रचना -**

गत म्हणजे एखाद्या रागाचे स्वर घेऊन बांधलेली रचना होय त्यामुळे त्या रागाचे स्पष्ट रूप त्या रचनेतून दिसणे आवश्यक असते. रागाचे स्वर घेऊन ते जोडत जाणे असा अल्प अर्थ यात अभिप्रेत नाही तर त्या राग रूपाचे दर्शन त्यातील मुख्य स्वरसंगतींनी दर्शविणारी गत असते. उदाहरण म्हणून दिलेल्या गती मध्ये आपल्याला स्पष्ट दिसून येते की, म ग प, सा ग रे ग, म ध प, नी रे ग म ध नी इत्यादी यमन रागाचे स्वरूप दर्शवणाऱ्या स्वरसंगती आहेत. त्याचा क्रम सुद्धा असा ठेवण्यात आलेला आहे ज्यातून रागाची आवक जावक स्पष्ट लक्षात येईल.

**ब. गत म्हणजे अर्थपूर्ण रचना –**

या ठिकाणी शब्द आणि त्यातून उत्पन्न होणारा अर्थ अभिप्रेत नसून स्वर समुदायातून निर्माण होणारा अर्थ, अर्थपूर्णता अभिप्रेत आहे. रागातील स्वरांची तालाच्या मात्रा आणि विभागानुसार केलेली मांडणी त्या गतीस एक अर्थ प्राप्त करून देत असते. ज्याप्रमाणे बोलताना शब्दांची योग्य रचना करत एक वाक्य निर्मिती होत असते त्याचप्रमाणे स्वरांमार्फत रागाचे वाक्य निर्माण होणे आवश्यक असते असे अर्थपूर्ण स्वर वाक्य निर्माण ज्यामध्ये होईल तिला अर्थपूर्ण रचना म्हटले जाते. गतीचे स्वरूप शब्दांव्यतिरिक्त स्वरांमधून अर्थपूर्णता निर्माण करणारे असते. वरील गत क्रमांक १ च्या पहिल्या ओळीत सुद्धा हा विषय स्पष्ट होतो. 'नीध पम गरे सा गरे ग म ग मधप' या स्वरांच्या ओळीतून एक स्वरवाक्य तयार होत आहे. आणि त्याचे उत्तर म्हणून गतीची दुसरी ओळ समर्पक ठरते आहे.

**क. पूर्ण रचना –**

गत म्हणजे एक प्रकारे बंदिशच होय. ज्याप्रमाणे बंदिश ही परिपूर्ण किंवा पूर्ण असणे आवश्यक असते तसेच गतदेखील पूर्ण रचना असते यामध्ये स्थायी आणि अंतरा असे दोन घटक असतात. शिवाय सप्तकांचा विचार केल्यास मंद्र, मध्य आणि तार सप्तकातील स्वरस्थानांचा उपयोग गतीत होत असतो ज्यामुळे विस्तारात देखील या स्वरस्थानांचा उपयोग होऊ शकतो आणि वादनात नवता येते. वर दिलेल्या गतीची रचना बघितल्यास दिसून येईल की, मध्य सप्तकाच्या निशाधापासून सुरु होऊन ती दुसर्या ओळीत मंद्र निशाधापर्यंत येते, तसेच अंतऱ्यात ती तार गांधारापर्यंत जाते. म्हणजेच या गतीमध्ये मंद्र, मध्य आणि तार सप्तकाचा अंतर्भाव आहे, आणि म्हणूनच विस्ताराचत देखील या सर्व स्थानांचा उपयोग होतो.

**ड. विस्तारक्षम रचना –**

राग संगीतामध्ये गायलेल्या अथवा वाजविलेल्या रचनेचा विस्तार करणे त्याची उकल करणे हा एक महत्त्वाचा भाग असतो, त्यामुळे गत देखील याच गुणाने परिपूर्ण असणे आवश्यक असते. विस्तारक्षम याचा अर्थ आलाप, लयकारी तान इत्यादी विविध घटकांद्वारे रागाचा विस्तार होण्यास उपयुक्त रचना म्हणजे गत.

खयाल गायनामध्ये शब्द उपलब्ध असतात त्यामुळे गायक राग विस्तारात शब्दांचा उपयोग करत विस्तार करू शकतात, मात्र गती मध्ये शब्द उपलब्ध नाहीत त्यामुळे रागातील विविध महत्त्वपूर्ण स्वरसंगती, खास जागा असाव्या ज्याचा उपयोग राग विस्तारात वादक करू शकतात. उत्तर भारतीय शास्त्रीय संगीतात राग विस्ताराची एक महत्त्वाची पद्धत म्हणजे बंदीच्या अंगाने गाणे होय याचाच उपयोग गत वाजवताना वादक करू शकतात. उदाहरण म्हणून दिलेली गत मुळात मध्यलयीतील आहे. समेला येणाऱ्या गंधार स्वरानंतर एक मात्रेची जागा रिकामी सोडली आहे, त्यामुळे राग विस्तारास तिकडून सुरुवात करता येते. मुखड्या नंतर एकपट असल्याने आलाप करण्यास सुलभता होते. शिवाय लयकारी आणि तान करण्यासाठी हि गत उपयुक्त ठरते आहे.

मराठी शब्दकोशात गत या शब्दाचा एक अर्थ मार्ग असा देखील सांगण्यात आलेला आहे. मार्ग म्हणजे रस्ता. संगीत विषयाच्या दृष्टीने विचार केल्यास गत यास योजलेला मार्ग हा शब्द देखील गैरलागू वाटत नाही. उत्तम बंदिश ज्याप्रमाणे गायकास राग विस्तार कसा करावा याचे मार्गदर्शन करत असते तसेच उत्तम गत राग विस्ताराचा मार्ग वादकास सुचवत असते म्हणूनच गत म्हणजे मार्ग ही व्याख्या देखील ओघाने येते. वरील गतीचा विस्तार करताना त्यामध्ये 'सा ग रे ग' 'म ग प' अशा स्वरसंगती येतील. म्हणजेच गत राग विस्ताराचा मार्ग दाखवत आहे.

वरील सर्व वैशिष्ट्यांव्यतिरिक्त संगीत रत्नाकर ग्रंथात उत्तम बंदिशीची लक्षणे देण्यात आलेली आहे त्यातील काही घटक गतीला देखील लागू होऊ शकतात,

१. व्यक्त –

याचा अर्थ व्याकरण शुद्ध, रागातील स्वरांची स्पष्ट योजना असा होय. व्याकरण शुद्धता याचा गतिशी संबंध जोडताना शुद्ध रागरूप अभिप्रेत आहे.

२. सम –

याचा अर्थ गतीच्या स्थायी आणि अंतऱ्यात समान वर्ण, लय, स्थान असणारी रचना होय. कुठल्याही गतीचा विचार केल्यास असे स्पष्ट दिसून येते की स्थायीत ठेवलेले वर्ण ठेवलेली विशिष्ट गती लय याचेच साधारण तार सप्तकातील रूप म्हणजे अंतरा होय त्यामुळे सम हा घटक गत रचनेस सुद्धा लागू होतो.

३.मधुर-

उच्च कोटीचे सौंदर्य असणारी रचना हे गतीचे देखील लक्षण आहे. हे सौंदर्य घटक म्हणजे स्वर, लय इत्यादी होय. रागातील स्वर समूहातून निर्माण होणारे सौंदर्य, स्वरांमधील लगाव तसेच लघुत्व, दीर्घत्व, आंदोलन, मुरकी इत्यादी घटकांचा गत रचनेत योग्य उपयोग केल्याने ती लोकचित्तहारक होऊ शकते हाच मधुर शब्दाचा अर्थ आहे. वर उल्लेखित सौंदर्य मूल्यांचा समतोल राखत केलेला उपयोग गतरचनेमध्ये प्रवाहित्व निर्माण करतो त्यामुळे गत ही प्रवाही असते असे स्पष्ट होते. हे सर्व गुण वरील गतीमध्ये स्पष्ट दिसून येतील, त्यामध्ये स्वरांची, स्वरसंगतीची विशेष रचना आहे, त्याचा एक क्रम आहे, त्यात 'सा ग रे ग, म ग प' अशा स्वर संगती आहेत.

वरील सर्व विवेचनावरून गत म्हणजे रागात लागणाऱ्या स्वरांचा आधार घेत केलेली लयबद्ध रचना म्हणजे गत असे म्हणता येते. गत पूर्वी फक्त सतार आणि सरोद वाद्यांवरील रचनेस म्हटले जात असे मात्र त्यातील सर्व घटक आकर्षकता

रंजकता हे इतर वाद्यांची संबंधित रचनांमध्ये देखील दिसून येते त्यामुळे संतूर शहनाई सारंगी बासरी संवादिनी इत्यादी अनेक वाद्यांवर वादनासाठी निर्मित रचनांना गत म्हणता येते. गायनातील बंदिश आणि वाद्यांवरील गत यांचा परस्पर विचार करता असे स्पष्ट होते की, गतीमध्ये फक्त शब्द नाहीत बाकी अर्थपूर्णता, विस्तारक्षमता तशीच आहे. या कारणाने ख्यालातील बंदिशी प्रमाणेच वाद्यांवरील गत देखील तितकीच लोकप्रिय रचना ठरलेली आहे.

**संदर्भ सूची,**

१. सुधीर माईणकर, 'तबला वादन कला और शास्त्र'
२. भगवत शरण शर्मा, 'सितार – मालिका', संगीत कार्यालय हाथरस
३. लिव्हिंग आयडीओम्स इन हिंदुस्थानी म्युजिक
४. मो. वी. भाटवडेकर, 'बंदिश – एक मुक्तचर्चा'
५. आनंद धर्माधिकारी, 'ख्याल प्रकटीकरणातील बंदिशीचा साहित्यिक व सांगीतिक विचार'
६. 'राग ताल दर्शन', अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, प्रकाशन
७. तुळशीदास बोरकर, 'संवादिनी साधना' श्रीनवदुर्गा प्रकाशन.

**प्रा. प्रवीण कासलीकर,**
भारती विद्यापीठ विश्वविद्यालय,
स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, पुणे